**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1191/2007.**

श्री छगनलाल काशीराम शरणागत
गणित चित्रकला निदेशक
शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. एम. हस्ते
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय सिव्हील लाईन, नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
उपसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय सिव्हील लाईन, नागपूर ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.12.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.8.2006 (कार्यालयात प्राप्त दि. 5.8.2006) रोजी माहिती अधिकारी म्हणून उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांना खालिलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

घरबांधणी अग्रीम, बदली व प्रलंबित देयकासंबंधातील, कागदपत्रासह माहिती पुरविण्याबाबत. माहितीचा कालावधी सन 2002 ते आजपावेतो.

अ) भंडारा येथे घर बांधण्यासाठी अग्रीम मंजूरी आदेशात नमूद विभिन्न अटी व शर्तीपैकी एक म्हणजे अग्रीम धन मंजूर करण्याबाबतचे नियमन करणा—या मुंबई वित्तीय नियम 1959 मधील प्रकरण 11 व अपेंडीक्स 26 मधील तरतुदींचे काटेकरपणे पालन करण्याबाबत म्हटले आहे. हयाकरिता उपरोक्त दस्तऐवजांची प्रत्येकी एक सुस्पष्ट प्रत पुरविण्यात यावी.

ब) घरबांधणी नियम 1962 मधील लागू असलेल्या विविध अटींची माहिती देण्यात यावी.

क) सन 2006 मध्ये आपले स्तरावरुन प्रशासकीय व विनंतीनुसार करण्यात आलेल्या एकूण बदल्यांची संवर्गनिहाय माहिती तसेच यापैकी सुध्दीपत्राद्वारे स्थान बदल करुन दिलेल्या बदल्यांची संख्यात्मक माहिती दयावी. शिवाय हयावर्षीचे बदल्यांची (एकुण संख्येच्या) टक्केवारी किती याची माहिती देण्यात यावी.

ड) औ. प्र. संस्था भंडारा (मुलांची) येथील गणित निदेशकांची मंजूर असलेली पदे, त्या पदांवर सध्या कार्यरत कर्मचारी व त्यांचा कालावधी इ. बद्दल माहिती पुरवावी.

इ) माझी मे 2005 मध्ये तुमसर वरुन आर्वी येथे प्रशासकीय कारणास्तव करण्यात आलेली बदली शासकिय धोरणानुसार असल्याचे आपणाद्वारे मा. महाराष्ट्र प्रशासकिय प्राधिकरण नागपूर यांचे समक्ष सांगण्यात आले होते. सबब ज्या धोरणात्मक बाबींचा समावेश असलेले शासन निर्णय वगैरे दस्तऐवजांची प्रत देण्यात यावी.

प) दि. 1 जुलै 2006 पासून नवयाने लागू करण्यात आलेल्या बदली कायदा संबंधीची एक प्रत पुरविण्यात यावी.

फ) भंडारा येथे स्वखर्चाने बदली करण्याबाबत गेल्या चार वर्षापासून असलेली विनंती ज्या कारणास्तव नाकारण्यात आली होती याबाबत माहिती देण्यात यावी.

ग) भंडारा येथे स्वखर्चाने जाण्यास तयार असतांना देखील प्रशासकीय सोयीस्तव आर्वी येथे मला स्थानांतरीत करण्यात आले. घटनेस एक वर्षाचा कालावधी पूर्ण होत चालला तरी यापोटी अनुज्ञेय बदलीप्रवास भत्ता अजूनपर्यंत दिलेला नाही. दि. 29.9.2005 ला सादर व सध्या आपले कार्यालयात मंजूरीसाठी प्रलंबित देयकातील राशी मिळण्यास 6 महिनेपेक्षा जास्त कालावधी लागल्याने शासन निर्णयानुसार हयावर 12 टक्के दराने व्याज मिळण्याबाबत माहिती देण्यात यावी.

ह) वडिलाचे वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्याबाबत दि. 29.9.2005 ला औ. प्र. संस्था आर्वीचे कार्यालयात सादर केलेल्या देयक दुस–यांदा आपले कार्यालयात मंजूरीसाठी प्रलंबित असल्याचे कळले. यालासुध्दा जवळपास एक वर्ष पूर्ण होत चालला तरी राशी मिळालेली नाही. याचे विलंबाची कारणेसह माहिती दयावी व व्याज देण्याची तदतूद करण्यात यावी.

ज) 12 वर्षाची सेवा पूर्ण झालेबद्यल वरिष्ठ वेतनश्रेणीचा टप्पा लागू करण्यासाठीचा प्रस्ताव मंजूरीसाठी आपले कार्यालयात प्रलंबित आहे. हयात सुध्दा होत असलेल्या विलंबाबाबत माहिती देण्यात यावी.

ल) गोंदिया ऐवजी भंडारा येथे सेवानिवृत्ती स्थानात बदल करण्याबाबतचा माझा दिनांक 12.8.2002 चा अर्ज आपले कार्यालयात ज्या तारखेस पहिल्यांदा उपलब्ध झाला ती तारीख व आवक क्रमांकाची माहिती देण्यात यावी. तसेच गोंदियाचे हयासंबंधात पृष्ठांक क्रमांक सुध्दा कळविण्यात यावे.

म) नागपूर विभागात दि. 31.5.2006 ला गणित चित्रकला निदेशकांची एकूण मंजूर पदे व त्यावर कार्यरत निदेशकांची माहिती देण्यात यावी. हयापैकी सदर तारखेस ज्यांच्या एकाच स्थानातील सेवा अनुक्रमे 6,7,8,9 10 वर्षे किंवा जास्त झालेल्या आहेत अशांची माहिती पुरविण्यात यावी.

न) विनंती बदली करण्यासाठी आपणाद्वारे कर्मचा–यांच्या कोणकोणत्या अडचणी, समस्या व कारणे विचारात घेतली जातात याबद्यल माहिती देण्यात यावी.

सदरची माहिती ही नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 9.2.2006 रोजी आपल्याला पुरवण्यासाठी या कार्यालयाला उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यासाठी विहित शुल्क रु0 70 तसेच टपाल खर्च रु. 60 अशी एकुण रु. 130 अधिनियमातील तरतुदीनुसार या कार्यालयात जमा करावी लागेल वरील प्रमाणे शुल्क या कार्यालयात जमा केल्यानंतर आपल्याला सदर माहिती पुरविण्यात येईल अशी कळविण्यात आलेले दिसते. परंतु दि. 12.9.2006 रोजी आपण कशाच्या आधारे जादा रक्कम ठरविली याबाबत अधिनियमाच्या कलम 7 (3) (क) प्रमाणे हिशोबाचा तपशिल दिला नसल्याने जास्त असल्याची शंका आहे तरीपण संदर्भिय पत्रातील सुचनेनुसार आपणास आवश्यक असलेली फी हया संस्थेचे श्री जी. एस. भमाने भांडारपाल, औ. प्र. संस्था आर्वी यांचे हस्तदेय उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे वरील परिच्छेदातील शंकेचा विचार करुन सुधारित फी स्विकारण्यात यावी. तसेच हया बदल्यात पुरविण्यासाठी आपणाकडे तयार असलेली माहिती त्यांचेच द्वारे हस्तदेय पाठविण्यात यावी जेणेकरुन याकरिता लागणारा टपालखर्च वाचविता येईल असे प्रभारी सहा. संचालक यांना कळविण्यात आलेले दिसते. मात्र दि. 18.9.2006 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते व त्यांनी ती स्विकारलेली सुध्दा दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी दि. 13.10.2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय मुंबई येथे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपील करण्याचे कारण विहित कालावधीत माहिती उपलब्ध झाली नाही आणि अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी आहे असे कारण दिलेले आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 17.11.2006 रोजी एस. के. कामथे माहिती अधिकारी तथा सहा. संचालक यांनी अपीलकर्ता यांना उप संचालक कार्यालयात माहिती अधिकारी तसेच अपीलीय अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली असल्यामुळे आपण अपीलीय अधिकारी उप संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय नागपूर यांचेकडे संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले असून प्रत उप संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांना दिलेली

दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 13.10.2006 रोजी देण्यात आलेला असून अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते व सदरच्या निर्णया विरुध्दच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करुन प्रथम अपीलात दिलेले प्रत्युत्तर विहित मुदतीच्या आत नाही प्रत्युत्तरातून कसलीही माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही तसेच दि. 24.11.2006 चे पत्र हे मुदतीच्या आत नसल्याने माहिती पुरविण्यासाठी नियमानुसार निर्धारीत असलेल्या कालमर्यादेचे उल्लंघन करण्यात आले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन प्रकरण त्यांच्या स्तरावर निकाली काढण्या ऐवजी अर्जदाराचा अर्ज पुनश्च माहिती अधिकारी यांचेकडेच पाठविला असल्याचे (अर्थात) अपीलावर निर्णय देण्याची स्वतःची जबाबदारी झटकून पुन्हा त्या स्तरावर अर्ज पाठविल्याची कृती सुसंगत नाही अयोग्य आहे. मागणी केलेली माहिती अद्यापही उपलब्ध करुन दिलेली नसल्याने अपील अधिकाऱ्याने माहिती अधिकारी यांच्या बचावाकरीता अर्जदाराची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला व माहिती देण्याची टाळाटाळ केली इत्यादी मुद्दे उपस्थित करुन अचूक माहिती विनामुल्य पुरविण्यात यावी प्रकरणातील काही प्रसंगात त्यांनी निकाली काढण्यासाठी आवश्यक असलेली कार्यवाही करण्याबाबत कृपया संबंधितास सुचित करण्यात यावे आणि अधिनियमाच्या कलम 20 अन्वये दोषींवर शास्तीची कार्यवाही करण्यात यावी अशी विनंती केलेली आढळून येते.

3. अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 2.8.2006 च्या अर्जाचे अनुषंगाने (कार्यालयात प्राप्त दिनांक 5.8.2006) दि. 2.9.2006 रोजी विहित मुदतीत खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेता आली असती. परंतु अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणाच मुळात दि. 18.9.2006 रोजी केलेला असल्यामुळे त्यानंतरच माहिती उपलब्ध करुन दिली जावू शकते व त्यामुळे माहिती उपलब्ध करण्यासाठी विलंब झाला आहे हा मुद्या निकाली निघतो. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनीच स्वतः संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मुंबई यांचेकडेच प्रथम अपील दाखल केलेले असल्यामुळे व प्रथम अपीलीय अधिकारी हे उपसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण असल्यामुळे मुंबई कार्यालयातून नागपूर कार्यालयात प्रथम अपील हस्तांतरण करणे, कालावधी लागणे हे अपरिहार्य आहे

व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय हा विलंबाने दिला हे अपीलकर्ता यांचे म्हणणे सुध्दा निकाली निघते. माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूर करणारी दिली याबद्यल अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये किंवा आयोगाकडे कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला नाही. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्यामध्ये माहिती अधिकारी यांचे अभिप्राय येतील अशा प्रकारचे प्रश्न विचारलेले आहेत जे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरच्या माहितीमध्ये त्रुटी वाटत असल्यास उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे त्यांनी योग्य त्या सक्षम अधिका–याकडे तक्रार करुन न्याय मिळवून घेता येईल. अपील मेमोमधील प्रार्थनेमधील मुद्या क्र. 2 च्या बाबत केलेली विनंती ही अधिनियमाच्या व्याप्तीच्या बाहेर आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेली माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध झालेली असल्यामुळे माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत नसल्यामुळे शास्तीच्या बद्यलचा मुद्या सुध्दा निकालात निघतो त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 13.3.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.